जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा./आ.४ (३४)/२०२१/2751
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- 20/०९/२०२१

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा

**विषय :-** जीसीसी, जीसीसी-टिबीसी व जीसीसी-एसएसडी-सीटीसी परीक्षा ऑक्टो./नोव्हें.-२०२१ पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे जा.क्र.२५०६, दि.३१/०८/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की, जीसीसी, जीसीसी-टिबीसी व जीसीसी-एसएसडी-सीटीसी परीक्षा ऑक्टोबर/ नोव्हेंबर - २०२१ बाबत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरताना पूरग्रस्त भागातील संस्थाचालकांची नूतनीकरण व कागदपत्रे पूरपरिस्थितीमुळे खराब / भिजलेली / नष्ट झालेली आहेत असे निदर्शनास आले आहे.

तरी सदर संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांची उपरोक्त नमूद परीक्षांची आवेदनपत्र भरताना संबंधित संस्थाचालकांनी पूरग्रस्त असलेबाबतचे प्रमाणपत्र, पंचनामा अथवा तत्सम कागदपत्रे व पूरग्रस्त असल्याने नुतनीकरण इ. कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रासोबत सादर करता येत नसलेबाबतचा विनंती अर्ज आवेदनपत्रासोबत अपलोड करावेत व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित रहाणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कार्यवाही करावी.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे-१

प्रत माहितीस्तव :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)